# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी परिसर,
सांताक्रूझ (पूर्व) मुंबई - ४०००९८.
Email - dboee@exam.mu.ac.in

---

क्र.DBOEE/ICF/२०२५-२६/98 दिनांक : १९ सप्टेंबर, २०२५

**प्रती,**

**प्रा. गजानन वडेरे** **- अध्यक्ष**
पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय (स्वायत्त)
डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पस
प्लॉट क्र. १०, सेक्टर १६, न्यू पनवेल,
नवी मुंबई - ४१० २०६,

**प्रा. (सीए) नितीन कदम** **- सदस्य**
व्ही. के. कृष्ण मेनन महाविद्यालय,
भांडुप रेल्वे स्टेशन (पूर्व), वीर सावरकर मार्ग, भांडुप (पूर्व), मुंबई - ४०००४२

**प्रा. (सीए) वर्षा लुंड** **- सदस्य**
विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)
सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई - ४०००७१

**विषय : ई-समर्थ पोर्टलद्वारे संकलित परीक्षा शुल्क व विद्यापीठाच्या वाट्याचा हिस्सा जमा करण्याबाबतची समित्ती**

**महोदय / महोदया,**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अन्वये शैक्षणिक वर्ष 2023–24 पासून पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच शैक्षणिक वर्ष 2024–25 पासून पदवी अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठात राबविण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी *ई-समर्थ* ऑनलाइन प्रणालीचा वापर करण्यात येत असून, प्रवेशासाठी आवश्यक शुल्क व परीक्षा शुल्क हे ई-समर्थ *पोर्टलवरील* थर्ड पार्टी पेमेंट गेटवे प्रणालीद्वारे संकलित केले जात आहे. या प्रक्रियेनुसार संकलित रकमेतील विद्यापीठाच्या परीक्षा शुल्काचा तसेच विद्यापीठाच्या वाट्याचा हिस्सा विद्यापीठाकडे जमा करणे अपेक्षित आहे.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की काही महाविद्यालयांकडून विद्यापीठाचा हिस्सा अद्याप विद्यापीठाकडे जमा करण्यात आलेला नाही.

माननीय कुलगुरू महोदय यांच्या निर्देशानुसार, शैक्षणिक वर्ष 2024–25 मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांबाबत खालील माहितीचा एकत्रित अहवाल तयार करण्यासाठी आपली त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आलेली आहे -

1) कोणत्या महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क व विद्यापीठाच्या वाट्याचा हिस्सा विद्यापीठाकडे जमा केला आहे.
2) विद्यापीठाकडे प्रत्यक्ष किती रक्कम जमा झाली आहे.
3) किती रक्कम प्रलंबित असून ती संबंधित महाविद्यालयांकडे राहिलेली आहे.

समितीला आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय मदत खालील विद्यापीठाचे अधिकारी करतील -

1) डॉ. सतीश झेंडे - संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ.
2) सौ. रोहिणी सुपे - उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ.
3) सौ. सुजाता नवाले - उपकुलसचिव, पात्रता व नोंदणी विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ.
4) डॉ. प्रविण शिनकर - वरिष्ठ योजनाकार संगणक प्रक्रिया (DICT)

उक्त समितीने सर्व माहिती एकत्रित करून सविस्तर अहवाल संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना सादर करावा.

**(डॉ. पूजा रौंदळे)**
**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत,**

1) संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ.
2) उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ.
3) उपकुलसचिव, पात्रता व नोंदणी विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ.
4) वरिष्ठ योजनाकार संगणक प्रक्रिया (DICT)

**प्रत माहितीस्तव**
**स्वीय सहायक १) कुलगुरू २) प्र-कुलगुर ३) कुलसचिव ४) वित्त व लेखा अधिकारी**